ePaper

## कोटलीत आंदोलक महिलांवर पाकिस्तानी सैन्याचा गोळीबार?



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 01 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




रोहित पवारांकडे कचरा प्रश्नाचे उत्तर आहे का?

### महापालिकेने दिली होती इमारत रिकामी करण्याची नोटीस

# 'कोहिनूर' कोसळली; ९ जणांचा बळी



**महाईन्यूज | कोलकाता**

**भिवंडीत गुरुवारी रात्री उशिरा एक भीषण दुर्घटना घडली. भिवंडी-निझामपूर महापालिका क्षेत्रातील बालाजीनगर-गंगारामवाडी परिसरातील 'कोहिनूर अपार्टमेंट' ही चार मजली निवासी इमारत अचानक पत्त्यांच्या बंगल्यासारखी कोसळली. या दुर्घटनेत आतापर्यंत नऊ जणांचा मृत्यू झाला असून, ढिगाऱ्याखाली आणखी नागरिक आणि मजूर अडकले असण्याची भीती व्यक्त केली जात आहे.**

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) आणि ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाच्या (टीडीआरएफ) पथकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर रात्रीपासूनच मलबा हटवून अडकलेल्या नागरिकांचा शोध घेण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. अत्याधुनिक उपकरणे आणि फ्लड लाईट्सच्या सहाय्याने बचावकार्य सुरू ठेवण्यात आले आहे.

रात्रभर सुरू असलेल्या बचाव मोहिमेदरम्यान दोन जणांना ढिगाऱ्याखालून सुखरूप बाहेर काढण्यात बचाव पथकांना यश आले. प्राथमिक माहितीनुसार, दुर्घटनेच्या वेळी इमारतीमध्ये सहा मजूर आणि पाच स्थानिक रहिवाशांसह सुमारे ११ जण उपस्थित होते. त्यामुळे ढिगाऱ्याखाली आणखी काही जण अडकले असण्याची शक्यता आहे.

दरम्यान, या दुर्घटनेनंतर इमारतीच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. स्थानिक प्रशासनाच्या माहितीनुसार, 'कोहिनूर अपार्टमेंट' ही जुनी आणि जर्जर इमारत होती. भिवंडी-निझामपूर शहर महानगरपालिकेने या इमारतीला यापूर्वीच अतिधोकादायक घोषित केले होते. तसेच इमारत रिकामी करण्याबाबत नोटीस आणि सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, इमारत पूर्णपणे रिकामी होण्यापूर्वीच गुरुवारी रात्री अचानक कोसळली.

दुर्घटनेनंतर महापालिका प्रशासनाकडून शहरातील इतर धोकादायक इमारतींचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. महापौर नारायण चौधरी यांनी घटनास्थळी भेट देऊन बचावकार्याची पाहणी केली. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

शहरातील ज्या इमारती अतिधोकादायक घोषित करण्यात आल्या आहेत, तेथील नागरिकांनी स्वतःचा आणि कुटुंबाचा जीव धोक्यात न घालता तात्काळ सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे, असे आवाहनही महापौरांनी केले आहे. दरम्यान, ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांचा शोध घेण्यासाठी बचाव पथकांकडून अथक प्रयत्न सुरू असून, मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### धोकादायक इमारतीकडे दुर्लक्ष

महापालिकेने 'कोहिनूर अपार्टमेंट'ला यापूर्वीच अतिधोकादायक घोषित केले होते. इमारत रिकामी करण्याच्या नोटिसाही देण्यात आल्या होत्या. मात्र, नागरिकांचे स्थलांतर पूर्ण होण्यापूर्वीच इमारत कोसळली आणि ९ जणांना जीव गमवावा लागला.

### रात्रभर बचावकार्य

इमारत कोसळताच एनडीआरएफ, टीडीआरएफ आणि अग्निशमन दलाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली. अत्याधुनिक उपकरणांच्या मदतीने मलबा हटविण्याचे काम सुरू असून, आतापर्यंत दोघांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आहे.





# खडकवासलातून विसर्ग वाढला

## रस्ते जलमय, वाहतूक विस्कळीत; एकता नगरमध्ये सोसायट्यांमध्ये पाणी शिरले

महाईन्यूज । पुणे

**पुण्यात शुक्रवारी मुसळधार पावसाने हजेरी लावली असून पुणे शहर आणि जिल्ह्यात पावसामुळे रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला. सखल भागांमध्ये पाणी साचल्यामुळे वाहतुकीचा वेग मंदावला असून, काही ठिकाणी मोठी वाहतूक कोंडीही झाली. तर एकता नगर येथे पाणी शिरले असून सात ते आठ इमारतींना याचा फटका बसला आहे. पार्किंगमधील गाड्या बाहेर काढताना नागरिकांची तारांबळ उडाली आहे.**





शुक्रवारी दुपारपासून राज्यातील मुंबई, पुण्यासह पश्चिम महाराष्ट्र, छ. संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, जळगाव, धुळे या भागांमध्ये जोरदार पावसाने हजेरी लावली आहे.पुण्यात पावसामुळे धरणाच्या पाणी पातळीमधील झपाट्याने वाढ होत असल्याने दुपारी ३:०० वा. खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदी पात्रामध्ये ३५५७४ क्युसेक विसर्ग वाढवून ४३५७१ क्युसेक्स इतका करण्यात आला. या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या भागांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला.

पुण्यातील एकता नगरमध्ये शुक्रवारी पाणी शिरले. सात ते आठ सोसायट्यांमध्ये कमरे इतके पाणी भरले असून पार्किंगमधील वाहनांचे यात नुकसान झाले. प्रशासनाने जो मातीचा बांध घातला होता तो वाहून गेल्याचा दावा स्थानिकांनी केला.

### कोंढव्यात वाहतूक कोंडी

कोंढवा, वानवडी, एनआयबीएम आणि परिसरात दुपारच्या सुमारास मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली. अवघ्या काही वेळातच अनेक रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. कोंढवा, वानवडी, उंड्री, पिसोळी या भागात मुसळधार पावसामुळे दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांची विशेष गैरसोय झाली. कार्यालयीन वेळ असल्याने प्रमुख चौकांमध्ये वाहनांच्या रांगा लागल्या.

### घोड नदीपात्रात जाणे टाळा

आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी डोंगरी भागातील पावसामुळे हुतात्मा बाबू गेनू सागर डिंभे धरणाच्या पाणीसाठ्यात सातत्याने वाढ होत आहे. खबरदारीचा उपाय म्हणून शुक्रवारी (दि. ३१) सकाळी साडेदहा वाजल्यापासून धरणाच्या सांडव्यातून करण्यात येणाऱ्या विसर्गात वाढ करण्यात आली असून घोड नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहून नदीपात्रात जाणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## अमित शाह यांच्या दौऱ्याआधी पुण्यातील राजकारण तापलं; काँग्रेसचा इशारा

महाईन्यूज । पुणे

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नियोजित पुणे दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे आहेत. दिल्लीतील आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित मारहाणीच्या निषेधार्थ काँग्रेसकडून आंदोलनाची घोषणा करण्यात आली आहे. दुसरीकडे, या आंदोलनाला जशास तसे उत्तर देण्याचा इशारा भाजपने दिल्याने दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते आमनेसामने येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**



या पार्श्वभूमीवर गुरुवारी पुणे पोलिस आयुक्तालयात वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची बैठक झाली.या बैठकीत अमित शहा यांच्या दौऱ्यादरम्यानची सुरक्षा व्यवस्था, संभाव्य आंदोलने, कायदा व सुव्यवस्था; तसेच विविध संवेदनशील ठिकाणांवरील पोलिस बंदोबस्त याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजनांवरही बैठकीत भर देण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. या राजकीय कलगीतुऱ्यामुळे शहरातील वातावरण तापले असून,पोलिस व सुरक्षा यंत्रणांनी सुरक्षेचे कडेकोट नियोजन केले आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या पुणे दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन सतर्क झाले असून, त्यांच्या 'व्हीआयपी' ताफ्याला 'खड्डे दर्शन' होऊ नये यासाठी तातडीने रस्ते दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी या संदर्भात तातडीची आढावा बैठक घेऊन शहा यांच्या संभाव्य प्रवासाच्या मार्गावरील सर्व खड्डे तातडीने बुजवून रस्ते चकाचक करण्याची तंबी संबंधित अधिकाऱ्यांना दिली आहे.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अमित शहा हे सारसबाग परिसरातील त्यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी शनिवारी जाण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. सुरक्षा यंत्रणा आणि गर्दीचे नियोजन लक्षात घेता हा कार्यक्रम अद्याप अंतिम झालेला नसला, तरी ऐन वेळी धावपळ होऊ नये; म्हणून स्वारगेट, सारसबाग आणि व्होल्गा चौक परिसरातील रस्तेही सुस्थितीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. पोलिसांकडूनही या पार्श्वभूमीवर पुरेशी तयारी करण्यात आली आहे. शहरातील बहुतांश रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पसरल्याने सामान्य पुणेकर त्रस्त आहेत. मात्र, शहा यांच्या 'व्हीआयपी' दौऱ्याच्या निमित्ताने का होईना, प्रशासनाला जाग आली असून, काही भागांतील रस्त्यांना तरी 'अच्छे दिन' येणार असल्याचे चित्र आहे.

### ताफ्याचा मार्ग खड्डेमुक्त

या पार्श्वभूमीवर विमानतळापासून ते महर्षीनगरपर्यंत ज्या मार्गाने गृहमंत्री अमित शहा यांचा ताफा जाणार आहे, ते सर्व रस्ते खड्डेमुक्त, पॅचमुक्त, स्वच्छ आणि अतिक्रमणमुक्त ठेवण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत. शहा हे शुक्रवारी रात्रीच पुणे मुक्कामी येणार असल्याचे समजते. त्यांच्या वाहनांचा ताफा हा महर्षीनगर, स्वारगेट परिसरात जाणार-येणार असल्याने प्रशासनाकडून पुरेशी खबरदारी घेण्यात येत आहे.

# रोहित पवारांकडे कचरा प्रश्नाचे उत्तर आहे का?

## २३ दिवसांत एकही पर्याय नाही; ४४ वर्षांच्या कचरा व्यवस्थापनाच्या अपयशावरही मौन!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी कचरा डेपो दुर्घटनेतील दोषींवर १० दिवसांत कारवाई झाली नाही, तर पिंपरी-चिंचवड महापालिकेला टाळे लावू, असा इशारा आमदार रोहित पवार यांनी दिला आहे. दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, याबाबत कुणाचेही दुमत नाही. मात्र, पिंपरी-चिंचवडकरांच्या मनात काही प्रश्न उपस्थित होत आहेत.**

८ जुलै २०२६ रोजी मोशी कचरा डेपो दुर्घटना घडली. या दुर्घटनेला आज २३ दिवस उलटून गेले आहेत. मात्र, शहरातील कचरा व्यवस्थापनाची यंत्रणा अद्याप पूर्णपणे सुरळीत झालेली नाही. काही वर्षांपूर्वी 'कचरा कुंडीमुक्त शहर' म्हणून गौरविले गेलेले पिंपरी-चिंचवड आज अनेक ठिकाणी कचऱ्याच्या समस्येला सामोरे जात आहे. घराघरातून निघणाऱ्या कचऱ्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न गंभीर बनला आहे. अशा परिस्थितीत पिंपरी-चिंचवडकरांची अपेक्षा केवळ आंदोलनाची नाही, तर ठोस उपाययोजनांची आहे.

विशेष म्हणजे, पिंपरी-चिंचवडच्या कचरा प्रश्नाचा इतिहासदेखील तितकाच महत्त्वाचा आहे. १९७२ साली पिंपरी-चिंचवड नगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर मोशी येथील गावरान जमिनीवर शहरातील कचरा उघड्यावर टाकण्यास सुरुवात झाली. त्यानंतर १९९१ साली तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्या सरकारच्या काळात ही जागा अधिकृतपणे 'मोशी कचरा डेपो' म्हणून घोषित करण्यात आली. त्यानंतर शहराची लोकसंख्या, औद्योगिक वाढ आणि कचऱ्याचे प्रमाण झपाट्याने वाढत गेले. मात्र, कचरा व्यवस्थापनासाठी आवश्यक असणाऱ्या दीर्घकालीन नियोजनाचा अभाव कायम राहिला.

पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणावर दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २०१७ पर्यंत जवळपास एकहाती वर्चस्व होते. शहराच्या विकासातील अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची नोंद त्यांच्या नावावर आहे. मग, कचरा व्यवस्थापनासारख्या मूलभूत प्रश्नावर दीर्घकालीन उपाययोजना का राबविण्यात आल्या नाहीत? १९८२ ते २०१७ या ३५ वर्षांच्या कालावधीत कचऱ्यावर प्रक्रिया करणारा एकही सक्षम आणि आधुनिक प्रकल्प का उभा राहिला नाही? हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

आज मोशीमध्ये लाखो मेट्रिक टन कचऱ्याचे डोंगर उभे आहेत. हा कचरा एका दिवसात साचलेला नाही. त्यामागे चार दशकांचे अपुरे नियोजन, राजकीय आणि प्रशासकीय पातळीवरील दुर्लक्ष कारणीभूत आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे केवळ एका दुर्घटनेच्या चौकटीत पाहून चालणार नाही.

रोहित पवार यांनी महापालिकेला टाळे लावण्याची भूमिका मांडली. मात्र, गेल्या २३ दिवसांत शहरातील कचरा प्रश्नावर त्यांनी एकही ठोस पर्याय सुचविलेला नाही. मोशी डेपोवरील ताण कसा कमी करणार? पर्यायी जागा कोणती? कचऱ्याचे विकेंद्रीकरण कसे करणार? नव्या कचरा प्रक्रिया प्रकल्पांसाठी त्यांचा आराखडा काय आहे? पालिकेला टाळे लागल्यानंतर ४० लाख नागरिकांच्या घरातील कचऱ्याची विल्हेवाट कशी लावली जाणार? या प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत.

पिंपरी-चिंचवडकरांची अपेक्षा केवळ राजकीय भूमिका मांडण्याची नाही, तर कचरा प्रश्नावर कायमस्वरूपी आणि शाश्वत उपाय मांडण्याची आहे. दोषींवर कारवाई झालीच पाहिजे, पण शहरातील कचरा प्रश्न सोडविण्यासाठी काय करायचे, याचाही रोडमॅप जनतेसमोर येणे तितकेच महत्त्वाचे आहे.




### मोशी कचरा डेपो । To The Point :

- १९७२ साली पिंपरी-चिंचवड नगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर मोशी येथे उघड्यावर कचरा टाकण्यास सुरुवात झाली.
- १९९१ साली तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्या सरकारच्या काळात 'मोशी कचरा डेपो' अधिकृत करण्यात आला.
- २०१७ पर्यंत शहराच्या राजकारणावर दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे वर्चस्व होते.
- १९८२ ते २०१७ या ३५ वर्षांत कचऱ्यावर प्रक्रिया करणारा एकही सक्षम प्रकल्प उभारण्यात आला नाही.
- ८ जुलै २०२६ च्या दुर्घटनेनंतर २३ दिवस उलटूनही कचरा व्यवस्थापन पूर्णपणे सुरळीत झालेले नाही.
- रोहित पवार यांनी महापालिकेला टाळे लावण्याची भूमिका मांडली; मात्र, कचरा प्रश्नावरील कोणताही ठोस पर्याय अद्याप मांडलेला नाही.

# मोशी कचरा डेपो दुर्घटनेचा आता 'एसआयटी'कडून तपास!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी येथील कचरा डेपोमध्ये कचऱ्याचा प्रचंड ढिगारा 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या इमारतीवर कोसळून नऊ कामगारांचा मृत्यू झालेल्या दुर्घटनेचा तपास आता विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) केला जाणार आहे. दुर्घटनेमागील नेमकी कारणे, सुरक्षेतील त्रुटी आणि संबंधित अधिकारी व यंत्रणांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी पोलिसांनी एसआयटीची स्थापना केली आहे. त्यामुळे या प्रकरणात दोषी आढळणाऱ्या अधिकारी आणि संबंधित घटकांवर कारवाईची शक्यता निर्माण झाली आहे.**



मोशी कचरा डेपोमध्ये ८ जुलै रोजी कचऱ्याचा डोंगर वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या तीन मजली प्रशासकीय इमारतीवर कोसळला होता. या दुर्घटनेत नऊ कामगारांचा मृत्यू, तर आठ जण जखमी झाले होते. दुर्घटनेनंतर बचावकार्य करण्यासाठी एनडीआरएफ, भारतीय सैन्य, अग्निशमन दल आणि महापालिका प्रशासनाने सलग चार दिवस प्रयत्न केले.

या घटनेनंतर पोलिसांनी अँटोनी लारा रेन्यूएबल कंपनीच्या दोन अधिकाऱ्यांविरुद्ध सदोष मनुष्यवधासह विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. तसेच राज्य शासनाने विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय उच्चस्तरीय चौकशी समिती नियुक्त केली असून, या समितीकडूनही दुर्घटनेची स्वतंत्र चौकशी सुरू आहे.

दुर्घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तपास अधिक प्रभावी आणि सर्वंकष करण्यासाठी एसआयटीची स्थापना केली आहे. कचऱ्याचा ढिगारा कोसळण्यामागील तांत्रिक कारणे, सुरक्षेच्या नियमांचे पालन झाले होते का, संभाव्य धोक्याची पूर्वकल्पना असतानाही आवश्यक उपाययोजना का करण्यात आल्या नाहीत, याचा तपास एसआयटीकडून केला जाणार आहे.

याशिवाय महापालिका प्रशासन, संबंधित कंपनी आणि इतर जबाबदार घटकांची भूमिकाही तपासली जाणार आहे. तपासादरम्यान आवश्यक कागदपत्रे, तांत्रिक अहवाल, तज्ज्ञांचे अभिप्राय तसेच संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदविले जाणार आहेत. त्यामुळे तपासातून नेमकी कोणाची जबाबदारी निश्चित होते आणि कोणावर कारवाई होते, याकडे आता शहराचे लक्ष लागले आहे.

एसआयटीचे प्रमुख पोलीस उपायुक्त असून, त्यांच्या नेतृत्वाखाली दोन सहायक पोलीस आयुक्त, एक वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखेचे एक पोलीस निरीक्षक, एक सहायक पोलीस निरीक्षक, एक फौजदार आणि चार पोलीस अंमलदारांचा समावेश आहे. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त मारुती जगताप यांनी मोशी कचरा डेपो दुर्घटनेच्या तपासासाठी एसआयटी स्थापन करण्यात आली असून, या पथकाकडून दुर्घटनेची सखोल चौकशी सुरू असल्याचे सांगितले.



## भूमिका

**१९९७ ते २०१२ दरम्यान जन्मलेली ‘जेन-झी’ ही आज महाराष्ट्राच्या लोकसंख्येतील मोठा आणि प्रभावी घटक आहे. डिजिटल युगात वाढलेली ही पिढी तंत्रज्ञानाशी सहज जुळवून घेते, जागतिक पातळीवर विचार करते आणि पारंपरिक करिअरच्या चौकटीबाहेर जाऊन नवे पर्याय शोधते.**

# जेन-झीचा आक्रोश; सरकारने आता ऐकायलाच हवे!




मात्र, त्यांच्या अपेक्षा, अडचणी आणि आकांक्षांकडे शासनाच्या पातळीवर एकत्रितपणे पाहणारी सक्षम व्यवस्था अद्याप दिसत नाही. अलीकडील आंदोलनाने या दुर्लक्षित वास्तवाकडे सरकारचे लक्ष वेधले आहे. जेन-झीचे प्रश्न केवळ बेरोजगारीपुरते मर्यादित नाहीत. मानसिक आरोग्य, सोशल मीडियाचे वाढते व्यसन, ऑनलाइन फसवणूक, कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे बदलणारे रोजगार, गिग इकॉनॉमी, कौशल्य विकास, आर्थिक नियोजन, व्यसनाधीनता आणि ऑनलाइन छळ अशा अनेक आव्हानांना ही पिढी रोज सामोरी जात आहे. वि

विध विभागांकडे स्वतंत्र योजना असल्या तरी या सर्व समस्यांवर समन्वित पद्धतीने काम करणारी ‘वन-स्टॉप’ यंत्रणा राज्यात उपलब्ध नाही. त्यामुळे अनेक तरुण योग्य मार्गदर्शन आणि संधींपासून वंचित राहतात. सरकारने आता पारंपरिक योजनांच्या चौकटीपलीकडे जाऊन विचार करण्याची गरज आहे. प्रत्येक जिल्ह्यात ‘जेन-झी मदत केंद्र’, डिजिटल हेल्पलाइन, एआय-आधारित समुपदेशन, करिअर मार्गदर्शन, मानसिक आरोग्य सेवा आणि सर्व युवक योजनांसाठी ‘वन विंडो’ प्रणाली उभारणे आवश्यक आहे.

तसेच दरवर्षी ‘जेन-झी राज्य अहवाल’ प्रकाशित करून त्यांच्या स्थितीचा अभ्यास करणे आणि त्यानुसार धोरणे आखणे ही काळाची गरज आहे. जेन-झी आणि उद्योगजगत यांच्यातील दरी कमी करण्यासाठी कौशल्य विकास, स्टार्टअप्स आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणारी यंत्रणाही मजबूत करावी लागेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयावर ‘यापेक्षाही अधिक गहन विचाराची गरज आहे’ असे मत व्यक्त केले आहे.

ही सकारात्मक भूमिका असली तरी ती प्रत्यक्ष कृतीत उतरविणे अधिक महत्त्वाचे ठरणार आहे. ‘महाराष्ट्र जेन-झी आयोग’ किंवा ‘युवा भविष्य प्राधिकरण’ यांसारखी स्वतंत्र संस्था उभारून विविध विभागांमध्ये समन्वय साधला, तर युवकांच्या प्रश्नांवर अधिक परिणामकारक उपाय करता येतील. कौशल्य विकास, रोजगार, अध्यात्म, संस्कार आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल साधणारे उपक्रमही या पिढीला सकारात्मक दिशा देऊ शकतात. जेन-झी ही केवळ समस्याग्रस्त पिढी नसून महाराष्ट्राच्या भविष्यातील आर्थिक, सामाजिक आणि तांत्रिक प्रगतीची प्रमुख शक्ती आहे.

त्यांच्याकडे केवळ नोकरी शोधणारे तरुण म्हणून नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे, नवकल्पना करणारे आणि समाज घडवणारे नागरिक म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. जगातील अनेक देशांनी या पिढीसाठी स्वतंत्र धोरणे स्वीकारली आहेत. महाराष्ट्रानेही दूरदृष्टी दाखवत जेन-झीसाठी व्यापक आणि परिणामकारक धोरण राबविले, तर ही केवळ आजची गरज ठरणार नाही, तर राज्याच्या पुढील अनेक दशकांच्या विकासाची भक्कम गुंतवणूक ठरेल.

## प्रासंगिक »

### पश्चाताप

**एकदा एक कोल्हा भुकेने व्याकुळ होऊन अन्नासाठी भटकत होता. तेवढ्यात त्याला एक मोठ्ठा आवाज ऐकू आला. त्या आवाजाने कोल्हा घाबरला.**

पण तो आवाज कोणता प्राणी काढतोय हे जाणून घेण्याची उत्सुकता त्याला स्वस्थ बसू देईना. तो त्या आवाजाच्या दिशेने निघाला. शोधता शोधता त्या आवाजापर्यंत गेला, तेव्हा त्याच्या नजरेला एक नगारा दिसला.

त्यावर एका झाडाची फांदी वाऱ्याने आपटत होती. म्हणून तो आवाज निघत होता. हे पाहून कोल्हा त्या नगाऱ्यावर चढला व त्यावर पाय आपटू लागला. थोड्या वेळाने त्याला वाटले की, हे कातडे जर ओरबाडून काढले, तर आत खूप मांस मिळेल, दोन दिवसांची भूक भागेल.

तो कातडे कुरतडू लागला. त्याच्या दाढा दुखू लागल्या आणि कातडे फाटले, तेव्हा त्याला मांस न दिसल्याने तो दुःखी झाला. त्याला वाईट वाटले.

- तात्पर्य : **जो माणूस मागचा-पुढचा विचार करून वागतो, त्यावर पश्चाताप करण्याची वेळ येत नाही. अविचाराने कोणतीही गोष्ट केली की, वाट्याला दुःखच येते.**

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाया पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत. नियमांचे काटेकोर पालन व्हावे, भेसळ, अस्वच्छता आणि बेकायदेशीर प्रकारांवर कारवाई व्हावी, ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे.

# मुंढे-मार्ग की व्यवस्थेचा मार्ग?



मात्र, प्रत्येक वेळी एखाद्या कठोर अधिकाऱ्याच्या धडाकेबाज शैलीवरच व्यवस्था अवलंबून राहते, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे. कारण मजबूत प्रशासन हे व्यक्तीवर नव्हे, तर सक्षम आणि सातत्यपूर्ण व्यवस्थेवर उभे असते.

आपल्या समाजात नियमांचे पालन ही सवय नसून सक्ती असल्याची मानसिकता दिसून येते. वाहतूक नियम, स्वच्छता, अन्नाची गुणवत्ता किंवा सार्वजनिक शिस्त यांसारख्या मूलभूत गोष्टी नागरिकांनी स्वतःहून पाळायला हव्यात. परंतु तसे होत नाही. त्यामुळे एखादा अधिकारी कठोर कारवाई करतो, तेव्हा त्याचे नायकत्व निर्माण होते. ही परिस्थिती समाजाच्या नियमपालन संस्कृतीतील कमतरता अधोरेखित करते.

इतिहासात टी. एन. शेषन, गो. रा. खैरनार यांसारख्या अधिकाऱ्यांची उदाहरणे यापूर्वीही पाहायला मिळाली. त्यांच्या कार्यकाळात शिस्त निर्माण झाल्याचे चित्र दिसले; मात्र ते पदावरून गेल्यानंतर व्यवस्था पुन्हा जुन्याच मार्गावर गेली. यावरून स्पष्ट होते की, व्यक्तिनिष्ठ बदल तात्पुरते असतात, तर संस्थात्मक सुधारणा दीर्घकालीन परिणाम घडवतात.

समाजात व्यक्तिपूजेची प्रवृत्तीही या समस्येला खतपाणी घालते. नियम पाळणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असताना त्यासाठी एखाद्या अधिकाऱ्याची भीती लागावी, ही स्थिती प्रगल्भ लोकशाहीस शोभणारी नाही. कायद्याचे पालन ही संस्कृती बनली पाहिजे, अन्यथा कठोर अधिकारी बदलले की पुन्हा जुन्याच समस्या डोके वर काढतात.

मुंढे यांच्या कारवाया चुकीच्या नाहीत; उलट त्या आवश्यकच आहेत. परंतु अशा कारवायांची गरजच भासू नये, अशी सक्षम आणि उत्तरदायी व्यवस्था उभी करणे हे सरकार आणि समाज या दोघांचेही कर्तव्य आहे. नागरिकांनीही नियमांना अपवाद नव्हे, तर जीवनशैली मानले पाहिजे.

शेवटी, समाजाचा विकास एखाद्या नायकामुळे होत नाही; तो सक्षम संस्था, पारदर्शक प्रशासन आणि जबाबदार नागरिक यांच्या एकत्रित प्रयत्नांतून घडतो. व्यक्तींवर अवलंबून राहणारी व्यवस्था कायमस्वरूपी बदल घडवू शकत नाही. त्यामुळे ‘मुंढे-मार्ग’ हा उपाय असू शकतो; पण तो अंतिम उत्तर ठरू शकत नाही. खरी गरज आहे ती नियमाधारित, स्वयंस्फूर्त आणि जबाबदार समाजव्यवस्था उभारण्याची.

## ।। अभंगवाणी ।।



आलिंगनें घडे ।
मोक्ष सायुज्यता जोडे ॥१॥

ऐसा संताचा महिमा ।
जाली बोलायाची सीमा ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# भारत बनतोय बालस्थूलतेचे केंद्र!

## ४.१ कोटी मुले जादा वजनाच्या विळख्यात; महाराष्ट्रातील चित्रही गंभीर

**महाईन्यूज । मुंबई**

**भारतात बालस्थूलतेचे प्रमाण वाढत असून, सध्या ५ ते १९ वर्षे वयोगटातील सुमारे ४.१ कोटी मुले जादा वजन किंवा स्थूलतेने ग्रस्त असल्याचे समोर आले आहे. हा कल कायम राहिल्यास २०३० पर्यंत जगातील बालस्थूलतेमध्ये भारताचा वाटा ११ टक्क्यांहून अधिक असेल, असा इशारा भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (आयसीएमआर) आणि राष्ट्रीय पोषण संस्था यांच्या नेतृत्वाखाली तयार करण्यात आलेल्या ‘लेट्स फिक्स अवर फूड’ या धोरणात्मक अहवालात देण्यात आला आहे.**



एकट्या महाराष्ट्राचा विचार केला, तर महाराष्ट्र राज्य आर्थिक सर्वेक्षण २०२५ मध्ये राज्यात शून्य ते अठरा वयोगटातील २.१८ कोटी मुले आहेत. यापैकी १६.६ टक्के मुले, तर मुलींमध्ये १६.२ टक्के लठ्ठपणाची समस्या आढळून आली आहे. २००३ पासून मुलांच्या लठ्ठपणा आणि आरोग्यावर राज्यात काम करणाऱ्या जे. टी फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने याविषयी सर्वेक्षण केले. यानुसार महाराष्ट्राची ही आकडेवारी समोर आली आहे.

भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद अहवालानुसार भारतात ५ ते १९ वर्षे वयोगटातील ५६.१ कोटी मुले असून, ही संख्या देशाच्या लोकसंख्येच्या सुमारे २८.५ टक्के आहे. जगभरात आता प्रत्येक पाचपैकी एक मूल जादा वजनाचे, तर सातपैकी एक मूल स्थूल असल्याचे नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, प्रथमच कमी वजनापेक्षा स्थूलता ही मुलांमधील अधिक मोठी कुपोषणाची समस्या बनल्याचे संशोधनात स्पष्ट करण्यात आले आहे.

अहवालात बालस्थूलतेमागील प्रमुख कारणांमध्ये जास्त चरबी, साखर आणि मीठ अर्थात ‘एचएफएसएस’ असलेल्या पदार्थांचे वाढते सेवन, जंक फूडचा वाढता वापर, फळे-भाज्या आणि कडधान्यांचे अपुरे सेवन, शारीरिक हालचालींचा अभाव यांचा उल्लेख करण्यात आला आहे. कोव्हिडनंतर मुलांमध्ये प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांचे सेवन अधिक वाढल्याचेही निरीक्षण नोंदविण्यात आले आहे.

‘कॉम्प्रिहेन्सिव्ह नॅशनल न्यूट्रिशन सर्व्हे’ मधील आकडेवारीनुसार, सुमारे १० टक्के किशोरवयीन मुले मधुमेहाच्या उंबरठ्यावर असून, १ टक्का मधुमेही, तर सुमारे ५ टक्के मुलांमध्ये उच्च रक्तदाबाची सुरुवात झालेली आहे. त्यामुळे बालस्थूलता ही केवळ वजनाची समस्या नसून, भविष्यात मधुमेह, हृदयविकार, उच्च रक्तदाब आणि इतर असंसर्गजन्य आजारांचे मोठे संकट निर्माण करू शकते, असा इशारा अहवालात देण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर शाळांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे संशोधकांनी नमूद केले आहे. देशातील १०.१ लाख शाळांमध्ये २४.७ कोटी विद्यार्थी शिक्षण घेत असून, विद्यार्थी आयुष्यातील सुमारे १२ हजार तास शाळेत घालवतो. त्यामुळे शाळांमध्ये ‘जंक फूड’च्या विक्रीवर निर्बंध, पोषण शिक्षण, दररोज किमान ६० मिनिटे शारीरिक हालचाल, वार्षिक हेल्थ अँड न्यूट्रिशन रिपोर्ट कार्ड, तसेच ‘शुगर बोर्ड’ आणि ‘ऑइल बोर्ड’ अनिवार्य करण्याची शिफारस अहवालात करण्यात आली आहे.

### प्रमुख शिफारसी

- शाळांमध्ये जंक फूड विक्री व जाहिरातींवर कठोर बंदी
- प्रत्येक विद्यार्थ्यासाठी दररोज ६० मिनिटे व्यायाम
- हेल्थ अँड न्यूट्रिशन रिपोर्ट कार्ड अनिवार्य
- शुगर बोर्ड आणि ऑइल बोर्ड सर्व शाळांमध्ये सुरू करणे
- पोषक आहार हा अभ्यासक्रमाचा भाग करणे
- पालक, शाळा आणि सरकारचा समन्वय वाढविणे

# रस्ते की खड्ड्यांचे जाळे? छगन भुजबळांचा सरकारला घरचा आहेर!

**महाईन्यूज । नाशिक**

**नाशिक शहरात रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे होणारे अपघात आणि निष्पाप नागरिकांचे जाणारे जीव यावरून अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. “नाशिक एवढे बेकार कधीच नव्हते. सध्याची परिस्थिती पाहता शहर वाऱ्यावर सोडले आहे का?” असा थेट सवाल करत भुजबळ यांनी स्वपक्षीय सरकार आणि स्थानिक प्रशासनाला घरचा आहेर दिला आहे. हा गंभीर विषय आपण थेट मंत्रिमंडळ बैठकीत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.**



नाशिकमध्ये खड्ड्यांमुळे आतापर्यंत ५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. यावर बोलताना भुजबळ आक्रमक झाले. ते म्हणाले, “हे चित्र आमच्या थेट मुळावर येत आहे. रस्त्यांच्या या दुरवस्थेमुळे वाहतूक मंदावते आणि प्रचंड कोंडी होते. यामध्ये पोलीस तरी काय करणार? स्थानिक नगरसेवक वैतागले आहेत आणि महापौरही काही करू शकत नाहीत. कुंभमेळ्यासाठी रस्ते खोदले असतील, तर पर्यायी रस्त्यांची सोय करणे प्रशासनाचे काम आहे. पाऊस ओसरताच तातडीने खड्डे बुजवा. एकाच खड्ड्यावर दुप्पट काम करावे लागले तरी हरकत नाही, पण निष्पाप नागरिकांचे बळी जाता कामा नयेत.”

महापालिका आणि कुंभमेळा प्राधिकरण यांच्यातील परस्परविरोधी कारभारावर भुजबळांनी जोरदार बोट ठेवले. “माझे काम नाही, त्याचे काम आहे... अशी जबाबदारी एकमेकांवर ढकलून चालणार नाही. अधिकारी काही फक्त कार्यालयात बसण्यासाठी नाहीत. शहरात रस्ते, पाणी किंवा बांधकाम – शेवटी प्रत्येक गोष्टीची मुख्य जबाबदारी ही महापालिकेचीच आहे. कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, संबंधित प्राधिकरण आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यात तातडीने लक्ष घालावे. नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका, अन्यथा असंतोष उफाळून येईल,” असा सज्जड इशाराही त्यांनी दिला.

प्रशासकीय निष्काळजीपणामुळेच हे मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप करत भुजबळ म्हणाले, “जे लोक मृत्युमुखी पडले आहेत, ते शासन आणि महापालिकेच्या निष्काळजीपणाचे बळी आहेत. एका मृत व्यक्तीच्या कुटुंबाला प्रशासनाने १० लाख रुपयांची मदत दिल्याचे समजते. जसा एकाला न्याय दिला, तशीच १० लाखांची भरपाई खड्ड्यांमुळे मृत्यू झालेल्या सर्व ५ जणांच्या वारसांना मिळाली पाहिजे.”

### तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाईचे समर्थन

अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेल्या धडक कारवायांचे भुजबळांनी कौतुक केले. “अनेक वर्षांनंतर एफडीए विभागाला खऱ्या अर्थाने जाग आली आहे. तुकाराम मुंढे हे कडक शिस्तीचे आणि धडक निर्णय घेणारे अधिकारी आहेत. काहींना त्यांची कार्यपद्धती कडक वाटत असली, तरी लहान मुलांचे आरोग्य जपण्यासाठी आणि जंक फूडमुळे वाढणारे आजार रोखण्यासाठी अशाच कठोर अधिकाऱ्यांची गरज आहे. मुंढे यांच्या या मोहिमेला माझा पूर्ण पाठिंबा आहे,” असे सांगत भुजबळांनी सनदी अधिकाऱ्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची भूमिका घेतली.

# स्पेनवर स्थलांतरितांचे संकट!

## ५० हजार स्थलांतरित सीमा ओलांडून देशात घुसले, सैन्याचा गोळीबार

**महाईन्यूज । स्पेन**

**मोरक्कोमधून हजारो स्थलांतरितांनी गुरुवारी स्पेनच्या उत्तर आफ्रिकेतील सेउटा या प्रदेशात प्रवेश केला. यामुळे स्पेनला आता सीमेवर सैन्य तैनात करावे लागले आहे, ज्यामुळे १८ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. २०२१ नंतर स्पेन सर्वात मोठे स्थलांतरितांचे संकट झेलत आहे. स्पेनच्या गृह मंत्रालयाने शुक्रवारी सांगितले की, गेल्या २४ तासांत मोरोक्कोमधून समुद्र आणि जमिनीमार्गे सुमारे ४९,००० स्थलांतरितांनी सेउटा क्षेत्रात प्रवेश केला.**



जगण्याच्या चांगल्या संधी, आर्थिक परिस्थिती सुधारावी आणि स्वतःच्या देशातील अनिश्चित परिस्थितीतून सुटका व्हावी, यासाठी अनेकजण स्पेनमध्ये घुसण्याचा प्रयत्न करतात. युरोपमध्ये प्रवेशाचा मार्ग स्पेनमधून जातो. उत्तर आफ्रिकेतील सेउटा आणि मेलिला हे दोन शहरे युरोपियन युनियन आणि आफ्रिकेशी जोडलेली आहेत. ज्यांना युरोपमध्ये शिरायचे आहे, त्यांच्यासाठी ही दोन शहरे महत्त्वाची ठरतात.

अनेक स्थलांतरित मोरोक्कोच्या फिनदेक किंवा बेल्योनेच या शहरांमधून पोहत पोहत सेउटामध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न करतात. तर काही जण जमिनीवरील सीमा ओलांडण्याची जोखीम पत्करतात. स्पॅनिश अधिकारी हे अनेकांना पुन्हा हद्दपार करत असले तरी काहींना निर्वासितांच्या शिबिरात वास्तव्य करण्याची परवानगी देतात, तर काहींना स्पेनमध्ये आश्रय घेण्यासाठी अर्ज करण्याची मुभा दिली जाते.

स्पेनमधील ५ लाख अवैध स्थलांतरितांना सामावून घेण्याच्या निर्णयामुळे स्थलांतरितांची ही नवी भर पडल्याचे स्पॅनिश अधिकाऱ्यांनी फेटाळून लावले. समुद्रमार्गे आलेल्या स्थलांतरितांना पुन्हा मोरोक्कोत हद्दपार करण्यावर सर्वोच्च न्यायालयाने प्रतिबंध घातल्याचा हा परिणाम असू शकतो, असे स्पेन सरकारने म्हटले. या निर्णयामुळे मानवी तस्करी करणाऱ्या टोळ्यांनी मोठ्या प्रमाणात स्थलांतरितांना समुद्रामार्गे स्पेनमध्ये धाडले असावे, असा अंदाज स्पेन सरकारच्या प्रवक्त्याने रॉयटर्सशी बोलताना व्यक्त केला.

स्थलांतरित जादिद झकारियाने सेउटामध्ये ओल्या चिंब अवस्थेत पोहोचल्यानंतर रॉयटर्सशी बोलताना सांगितले की, पोलिसांनी आम्हाला रोखण्याचा पूर्ण प्रयत्न केला. मात्र आमची इच्छाशक्ती आणि दृढनिश्चयामुळे आम्ही इथे पोहचू शकलो.


### गुरुवारी सेउटामध्ये काय झाले?

सेउटाच्या ताराजल समुद्रकिनाऱ्याचे काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. ज्यात असंख्य स्थलांतरित समुद्रामार्गे आलेले दिसत आहेत. ते लाटा रोखणारी भिंत ओलांडून जाण्याचा प्रयत्न करत आहेत. यात बहुसंख्य पुरुषांचा समावेश असला तरी काही महिला आणि कुटुंबेही दिसत आहेत. यातील काही जण व्हिवा एस्पान्या आणि स्पेनचा विजय असो, अशा घोषणा देताना दिसत आहेत.

# चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग लवकरच भारत दौऱ्यावर येणार?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**गेल्या काही महिन्यांपासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सातत्याने भारतावर टीका करताना पाहायला मिळतात. अमेरिकेने भारतावर अनेकदा अतिरिक्त आयातशुल्क देखील लादलं. त्यामुळे अमेरिका-भारत संबंध ताणले गेले होते. तसेच रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर अमेरिका १०० टक्के टॅरिफ लादण्याच्या हालचाली करत असल्याचं सांगितलं जातं. या माध्यमातून भारत, चीनसह आणखी पाच देशांची कोंडी करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न असल्याचंही बोललं जात आहे.**






या घडामोडी सुरू असतानाच दुसरीकडे भारत आणि चीनच्या संबंधांमध्ये सुधारणा होत असल्याचं पाहायला मिळत आहे. आता चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग हे लवकरच भारताच्या दौऱ्यावर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नवी दिल्लीत होणाऱ्या ब्रिक्स (BRICS) परिषदेला उपस्थित राहण्यासाठी शी जिनपिंग हे सप्टेंबरमध्ये भारतात येण्याची शक्यता आहे.

जून २०२० मध्ये पूर्व लडाखमधील गलवान खोऱ्यात झालेल्या चकमकीनंतर भारत आणि चीन यांच्यातील संबंध तणावपूर्ण झाले होते. ही घटना घडल्यानंतर दोन्ही राष्ट्रांनी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (LAC) सैन्य तैनात केलं होतं. त्यामुळे भारत आणि चीनमधील संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला होता. त्यानंतर लष्करी आणि राजनैतिक चर्चेच्या काही फेऱ्या झाल्या होत्या. त्यानंतर भारतात चिनी गुंतवणुकीवर निर्बंध, आयातीवरील कडक तपासणी आणि कोरोनाच्या काळात दोन्ही देशातील विमानांची उड्डाणे थांबवण्यात आल्याने त्याचा मोठा परिणाम झाला होता. पण आता अलिकडच्या काही महिन्यांत हा तणाव कमी झाला असून दोन्ही बाजूंनी संवाद सुरू असल्यामुळे दोन्ही देशांतील संबंध सुधारण्याची चिन्हे दिसत आहेत.

दरम्यान, २०२० मधील गलवान खोऱ्यातील निर्माण झालेल्या तणावानंतर भारत-चीन संबंध हळूहळू सुधारत आहेत. आता १२ आणि १३ सप्टेंबर रोजी दिल्लीत ब्रिक्स (BRICS) परिषद होणार आहे. या ब्रिक्स परिषदेला अनेक देशांचे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. याच परिषदेसाठी शी जिनपिंग हे देखील उपस्थित राहण्याची शक्यता आहे. तसेच उच्च-स्तरीय चर्चेसाठी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल हे देखील चीनचा दौरा करण्याची शक्यता आहे. मात्र, याबाबत अद्याप तारखा निश्चित करण्यात आलेल्या नाहीत किंवा यावर अधिकृत कोणतीही प्रतिक्रिया समोर आलेली नाही.



# आसाम पूरग्रस्तांसाठी कार्तिक आर्यनची मोठी मदत

ईशान्य भारतातील आसाम राज्य सध्या भीषण पुराच्या संकटाचा सामना करत आहे. मुसळधार पावसामुळे अनेक नद्या दुथडी भरून वाहत असून लाखो नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक कुटुंबांनी आपली घरे गमावली आहेत, तर हजारो लोक मदत शिबिरांमध्ये आश्रय घेत आहेत. अशा कठीण परिस्थितीत अनेक बॉलिवूड कलाकार पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पुढे येत आहेत. अभिनेता सलमान खाननंतर आता कार्तिक आर्यन यानेही मोठी मदत जाहीर केली आहे.

कार्तिक आर्यनने आसाम मुख्यमंत्री मदत निधीत 1 कोटी रुपयांची देणगी दिली आहे. त्याच्या या मदतीची माहिती आसाम मुख्यमंत्री कार्यालयाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर अधिकृत पोस्टद्वारे दिली. या पोस्टमध्ये कार्तिक आर्यनचे आभार मानण्यात आले असून त्याच्या या योगदानामुळे पूरग्रस्तांसाठी सुरू असलेल्या मदत आणि पुनर्वसन कार्याला मोठा हातभार लागेल, असे नमूद करण्यात आले आहे.

आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनीही त्यांच्या अधिकृत 'एक्स' खात्यावरून कार्तिक आर्यनचे मनापासून आभार मानले. त्यांनी आपल्या संदेशात, "कार्तिक आर्यन यांचे हे उदार योगदान मनाला स्पर्श करणारे आहे. त्यांच्या मदतीमुळे पूरग्रस्त नागरिकांपर्यंत आवश्यक मदत अधिक प्रभावीपणे पोहोचवता येईल," असे म्हटले आहे.

आसामममध्ये सध्या अनेक जिल्हे पुराच्या पाण्याखाली आहेत. मुसळधार पावसामुळे रस्ते, पूल आणि शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक गावांचा संपर्क तुटला असून प्रशासनाकडून बचाव आणि मदतकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. हजारो नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले असून त्यांच्यासाठी अन्न, पिण्याचे पाणी, औषधे आणि इतर अत्यावश्यक वस्तूंची व्यवस्था केली जात आहे.

# बेधडक सई..



मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या बोल्ड आणि वैविध्यपूर्ण भूमिकांमुळे ओळखली जाणारी मराठी अभिनेत्री सई ताम्हणकर ही सिनेसृष्टीतील महत्त्वाच्या मुद्द्यांवर स्पष्टपणे मत मांडण्यासाठीही प्रसिद्ध आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत चित्रपटसृष्टीतील मानधनातील विषमता आणि समान वेतनाच्या मुद्द्यावर सईनं तिची ठाम भूमिका मांडली आहे. "कलाकाराचे मानधन ते पुरुष आहेत की स्त्री यावर नव्हे, तर त्यांनी प्रकल्पात दिलेल्या योगदानावर ठरायला हवे," असे सईने स्पष्ट केले. अनेक वर्षांच्या मेहनतीनंतर आज आपण स्वतःच्या हक्काच्या मानधनाची मागणी आत्मविश्वासाने करू शकतो, असे सांगताना सई म्हणाली, "मला माझे मूल्य माहीत आहे. मी चित्रपटाच्या चित्रीकरणापासून ते प्रदर्शनापर्यंत १०० टक्के योगदान देते, असा विश्वास निर्मात्यांनाही असतो. ही ओळख निर्माण करायला वेळ लागला, पण ते अशक्य नाही." मानधनाची बोलणी करताना नवोदित कलाकारांना काम गमावण्याची भीती वाटते. यावर सई म्हणाली, "मीसुद्धा या टप्प्यातून गेले असल्याने ही भीती समजू शकते. मात्र, कलाकारांनी स्वतःची किंमत आणि विश्वासार्हता ओळखणे गरजेचे आहे. आज जेव्हा मी योग्य मानधनाची मागणी करते, तेव्हा इतर कलाकारांसाठीही नवे दरवाजे उघडतात. त्यामुळे एखाद्या कलाकाराने योग्य मानधन मागितल्यास निर्मात्यांनी आश्चर्य व्यक्त करू नये."



# हॉलिवूड पदार्पणासाठी दिशा सज्ज


बॉलिवूड अभिनेत्री दिशा पाटनी आता हॉलिवूडमध्ये पाऊल ठेवण्यास तयार आहे. प्रियांका चोप्रा, दीपिका पदूकोन, अली फजल आणि अनुपम खेर यासारख्या कलाकारांप्रमाणे आता दिशा पाटनी देखील हॉलिवूडमध्ये स्वत:ची क्षमता सिद्ध करू पाहत आहे. ऑस्करविजेते केविन स्पेसी यांच्या दिग्दर्शनात तयार होणार सुपरनॅचरल थ्रिलरपट 'हॉलिगार्ड सागा : द पोर्टल ऑफ फोर्स'मध्ये दिशा दिसून येणार आहे. पाश्चिमात्य देशांमधील चित्रपट ऑडिशनवर प्रामुख्याने निर्भर असतो. तेथे काम मिळविण्यासाठी आम्हाला ऑडिशन द्यावी लागते. यात कधीकधी ते तुमचे पूर्वीचे काम पाहतात आणि तुम्हाला प्रोजेक्ट किंवा ऑडिशनचा प्रस्ताव देत असतात. परंतु तेथे काम मिळणे व्हिसा आणि इतर साधनांच्या उपलब्धतेवर निर्भर असते. अखेर तो वेगळा देश असतो आणि संधीवेळी तेथे हजर असावे लागते. भारतात बसून तेथील चांगल्या भूमिका मिळविता येत नाहीत. ऑनलाइन ऑडिशन देता येते, परंतु तेथे जात काम करणे सर्वात चांगले असल्याचे दिशाने सांगितले आहे. दिशा अलिकडेच अक्षय कुमारसोबत 'वेलकम टू जंगल' चित्रपटात दिसून आली आहे. तर आगामी काळात ती 'आवारापन 2'मध्ये दिसून येणार असून यात तिच्यासोबत इमरान हाश्मी असणार आहे. हा चित्रपट 14 ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार आहे.

# भारतीयांची फायनलमध्ये धडक!

## पात्रता फेरीत नीरजने ७९.६१ मीटरचा सर्वोत्तम थ्रो नोंदवला; 'राष्ट्रकूल' मध्ये रंगणार मेडलचा थरार

**महाईन्यूज । ग्लासगो**

**स्कॉटलंडच्या ग्लासगो येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल स्पर्धा २०२६ (CWG 2026) चा आज आठवा दिवस भारतीय चाहत्यांसाठी खास ठरला. गुरुवारी भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्राने पुरुषांच्या जॅव्हलिन थ्रो प्रकारात चमकदार कामगिरी करत अंतिम फेरीत धडक मारली. पात्रता फेरीत (Qualifying Round) नीरजने ७९.६१ मीटरचा सर्वोत्तम थ्रो नोंदवला.**



स्कॉटस्टौन स्टेडियमवर पार पडलेल्या या फेरीत केवळ नीरजच नाही, तर भारताच्या रोहित यादव आणि यशवीर सिंह यांनीही अंतिम फेरीचे तिकीट पक्के केले. रोहितने ७८.३७ मीटर आणि यशने ७८.३६ मीटर भालाफेक केली. पहिल्या दोन प्रयत्नांतच पदकाची फेरी पक्की झाल्यामुळे नीरजने तिसरा प्रयत्न घेतलाच नाही.

पात्रता फेरीत १४ देशांतील एकूण १८ भालाफेकपटू रिंगणात होते, ज्यापैकी सर्वोत्तम १२ खेळाडूंनी फायनल गाठली. या फेरीत ऑटोमॅटिक क्वालिफिकेशनसाठी ८४ मीटरचे आव्हान ठेवण्यात आले होते. मात्र, एकाही ॲथलीटला हा टप्पा गाठता आला नाही; त्यामुळे अव्वल १२ खेळाडूंना थेट अंतिम फेरीत प्रवेश देण्यात आला.

आता सर्वांचे लक्ष लागलेला मेडल इव्हेंट शुक्रवारी रात्री उशिरा ( १ ऑगस्ट 12 : 45) वाजता रंगणार आहे. पात्रता फेरीत श्रीलंकेच्या रुमेश पथिराजने ८२.८४ मीटरचा सर्वाधिक दूर भाला फेकत अव्वल स्थान पटकावले. दुसरीकडे, पाकिस्तानच्या अरशद नदीमने ७८.६३ मीटर थ्रोसह फायनलमध्ये जागा मिळवली आहे. अरशद हा या स्पर्धेतील विद्यमान विजेता असून त्याने २०२२ च्या बर्मिंघम राष्ट्रकुल स्पर्धेत ९०.१८ मीटरच्या विक्रमी थ्रोसह सुवर्णपदक जिंकले होते. इतकेच नव्हे तर तो सध्याचा ऑलिंपिक चॅम्पियनही आहे.

दोन वेळेचा ऑलिंपिक पदकविजेता नीरज चोप्रा याने २०१८ च्या गोल्ड कोस्ट राष्ट्रकुल स्पर्धेत ८६.४७ मीटर फेकीसह सुवर्णपदकावर आपले नाव कोरले होते. मात्र, दुखापतीमुळे त्याला २०२२ च्या बर्मिंघम राष्ट्रकुल स्पर्धेतून माघार घ्यावी लागली होती. आता पुन्हा एकदा सुवर्णवेध घेण्यासाठी नीरज सज्ज झाला आहे.

फायनलमध्ये अव्वल १२ भालाफेकपटूंनी दमदार कामगिरी करत अंतिम फेरीत स्थान निश्चित केले. श्रीलंकेच्या रुमेश पथिराज यांनी ८२.८४ मीटर भालाफेक करत अव्वल स्थान पटकावले, तर ग्रेनाडाच्या एंडरसन पीटर्स (८१.२९ मीटर), दक्षिण आफ्रिकेच्या डाऊ स्मिथ (८०.६४ मीटर) आणि इंग्लंडच्या बेन ईस्ट (८०.३८ मीटर) यांनीही ८० मीटरचा टप्पा पार केला. भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्राने ७९.६१ मीटर अंतर गाठत फायनलमध्ये धडक मारली. ऑस्ट्रेलियाचा कॅमेरॉन मॅकइंटायर (७८.९१ मीटर) आणि पाकिस्तानचा अरशद नदीम (७८.६३ मीटर) यांनीही प्रभावी कामगिरी केली. बहामासचा कीशॉन स्ट्रॅचन (७८.६० मीटर) तसेच भारताचे रोहित यादव (७८.३७ मीटर) आणि यशवीर सिंह (७८.३६ मीटर) यांनीही अंतिम फेरीत स्थान मिळवले. त्रिनिदाद आणि टोबॅगोचा केशॉर्न वॉलकॉट (७८.२६ मीटर) आणि नायजेरियाचा चिनेचेरेम न्नामदी (७५.२७ मीटर) यांनी अव्वल १२ मध्ये स्थान मिळवत फायनलचे तिकीट निश्चित केले. आता या सर्व खेळाडूंमध्ये सुवर्णपदकासाठी रंगतदार लढत पाहायला मिळणार आहे.

### ग्लास्गोमधील प्रतिकूल हवामानातही नीरजची बाजी!

ग्लास्गोमधील थंड हवामान आणि ढगाळ वातावरणामुळे खेळाडूंना मोठ्या आव्हानाचा सामना करावा लागला. ८४ मीटरचा 'ऑटोमॅटिक क्वालिफिकेशन' मार्क एकाही ॲथलीटला गाठता आला नाही. नीरज चोप्राने आपल्या सर्वोत्तम प्रयत्नात ७९.६१ मीटर अंतरावर भाला फेकत दोन्ही ग्रुपमधील कामगिरीच्या जोरावर पाचवे स्थान पटकावून अंतिम फेरी गाठली. या क्वालिफिकेशन फेरीत नीरजने पाकिस्तानच्या अरशद नदीमपेक्षा (७८.६३ मी) जास्त दूर भाला फेकला. भारतासाठी सर्वात मोठी समाधानाची बाब म्हणजे तिन्ही खेळाडूंनी टॉप-१२ मध्ये जागा मिळवली आहे.

## इंग्लंडच्या मुख्य प्रशिक्षकपदी निवड होताच फ्लेमिंगला माइकल वॉनचा थेट इशारा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**चेन्नई सुपर किंग्सला आयपीएलमध्ये मोठे यश मिळवून देणारे स्टीफन फ्लेमिंग आता इंग्लंडच्या कसोटी संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून नवी इनिंग सुरू करणार आहेत. या वर्षाच्या अखेरीस ते ही जबाबदारी स्वीकारणार आहेत. मात्र, पदभार स्वीकारण्यापूर्वीच इंग्लंडचे माजी कर्णधार माइकल वॉन यांनी फ्लेमिंग यांना एका महत्त्वाच्या आव्हानाची जाणीव करून दिली आहे. "फ्लेमिंग हे उत्तम प्रशिक्षक असले, तरी इंग्लंडकडे महेंद्रसिंग धोनीसारखा कर्णधार नाही," असा सूचक इशारा वॉन यांनी दिला आहे.**



माइकल वॉन यांनी 'द टेलीग्राफ'मधील आपल्या स्तंभात फ्लेमिंग यांच्या क्षमतेचे कौतुक केले, पण सोबतच एका मोठ्या अडचणीकडे लक्ष वेधले. वॉन यांनी म्हटले आहे की, "स्टीफन फ्लेमिंग हे एक रणनीतीकार आणि कुशल 'मॅन मॅनेजर' आहेत. आयपीएलमध्ये त्यांनी धोनीसोबत मिळून CSK च्या यशाचे उत्तम नियोजन केले. मात्र, इंग्लिश क्रिकेटमध्ये त्यांना एका मोठ्या आव्हानाचा सामना करावा लागेल. आमच्याकडे संघाची धुरा सांभाळण्यासाठी 'एमएस धोनी'सारखा कर्णधार उपलब्ध नाही."

तसेच फ्लेमिंग यांच्यासोबत पूर्वी असलेल्या सपोर्ट स्टाफचा उल्लेख करत त्यांनी लिहिले आहे की, चेन्नईमध्ये एरिक सिमन्स यांच्यासारखे उत्कृष्ट गोलंदाजी प्रशिक्षक त्यांच्या सोबतीला होते. आता इंग्लंडच्या ताफ्यात गोलंदाजीच्या रणनीतीत कसा बदल होतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

स्टीफन फ्लेमिंग आणि महेंद्रसिंग धोनी या जोडीने चेन्नईला पाच वेळा आयपीएलचे विजेतेपद मिळवून दिले आहे. मात्र, गेल्या काही हंगामांत संघाची कामगिरी ढासळल्याने फ्रँचायझीने फ्लेमिंग यांच्याशी असलेला करार संपवला. आता इंग्लंडच्या कसोटी संघाला नव्या उंचीवर नेण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर असेल.

जोबर्ग सुपर किंग्स फ्रँचायझीने ३० जुलै रोजी अधिकृतपणे या नियुक्तीची घोषणा केली. एल्बी मॉर्केल पहिल्यांदाच मुख्य प्रशिक्षकाची जबाबदारी सांभाळणार आहे. मात्र, सुपर किंग्स कुटुंबासोबत त्याचे नाते खूप जुने आहे.

### ब्रेंडन मॅक्युलम यांचा पायउतार

फ्लेमिंग हे इंग्लंडच्या कसोटी संघाचे प्रशिक्षक म्हणून ब्रेंडन मॅक्युलम यांची जागा घेतील; मॅक्युलम हे फ्लेमिंग यांच्याच देशातील, म्हणजेच न्यूझीलंडमधील आहेत. मॅक्युलम २०२२ पासून इंग्लंडचे प्रशिक्षक म्हणून काम पाहत होते. मात्र, पाकिस्तानविरुद्धच्या आगामी कसोटी मालिकेसाठी ते संघासोबत नसतील. या मालिकेसाठी हंगामी प्रशिक्षक मार्कस ट्रेस्कोथिक संघाची धुरा सांभाळतील. दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यापासून फ्लेमिंग संघाची जबाबदारी स्वीकारतील.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। शनिवार ।

दि. 01 ऑगस्ट 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE

Think | Thrive | Transform

SCAN TO APPLY

# B.Sc. FORENSIC SCIENCES (Hons.)



## Be the Reason Behind the Truth.

A multidisciplinary program that blends science, technology and investigation to analyze evidence, solve crimes and deliver justice.

### WHY CHOOSE THIS PROGRAM?

**EXPERIMENTAL LEARNING**
Hands-on training in modern laboratories, crime scene simulation and case studies.

**FUTURE-READY SKILLS**
Exposure to DNA Technologies and advanced analytics.

**FLEXIBLE CAREER PATHS**
Choose between industry internships, research projects or dissertation to become a specialist in your domain.

### WHAT YOU WILL LEARN

- Crime Scene Investigation
- Forensic Biology & DNA Analysis
- Forensic Chemistry & Toxicology
- Forensic Psychology
- Cyber Forensics
- Criminology & Criminal Law
- Digital & Computational Forensics

+91-8600091180 admission@dypiu.ac.in www.dypiu.ac.in

# गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने समाजसेवेचा संकल्प

## भारतीय जनता पार्टीचे संघटन सरचिटणीस ॲड. मोरेश्वर शेडगे यांची सामाजिक संवेदना

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**गुरुपौर्णिमा म्हणजे गुरुचरणी कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि समाजासाठी समर्पणाची भावना दृढ करण्याचा दिवस. या पावन पर्वाचे औचित्य साधत भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवडचे संघटन सरचिटणीस ॲड. मोरेश्वर शेडगे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती संचालित पुनरुत्थान समरसता गुरुकुलम, क्रांतिवीर चापेकर स्मारक आणि क्रांतिवीर चापेकर विद्यालयाच्या दुरुस्ती व बांधकामासाठी आर्थिक स्वरूपात देणगी अर्पण करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला.**





> “गुरु हे केवळ ज्ञानाचे दाते नसून, ते समाजसेवा आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा देणारे दीपस्तंभ आहेत. माझ्या वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून समाजोपयोगी कार्यासाठी योगदान देण्याचा संकल्प मी केला होता. गुरुपौर्णिमेच्या पावन दिवशी पुनरुत्थान समरसता गुरुकुलमच्या माध्यमातून आदिवासी बांधवांच्या शिक्षण आणि संस्काराच्या कार्यात खारीचा वाटा उचलता आला, हीच माझ्यासाठी सर्वात मोठी आनंदाची आणि समाधानाची बाब आहे. समाजाने आपल्याला भरभरून दिले आहे, त्याचे ऋण अशा विधायक कार्यातून फेडण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे.”
>
> **- ॲड. मोरेश्वर शेडगे, संघटन सरचिटणीस, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे पुनरुत्थान समरसता गुरुकुलम संकुलाचे मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे येथील विद्यार्थी, विद्यालय आणि गोशाळेला नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागला. या पार्श्वभूमीवर ॲड. शेडगे यांनी विद्यार्थी संकुलासाठी ५१ हजार रुपये, विद्यालयासाठी ५१ हजार रुपये अशी एकूण एक लाख रुपयांची आर्थिक मदत सुपूर्द केली. तसेच, गोशाळेसाठी एक टन चाऱ्याचीही मदत उपलब्ध करून देण्यात आली.

चिंचवड येथील पुनरुत्थान समरसता गुरुकुलममध्ये आयोजित गुरुपौर्णिमा उत्सवात ही देणगी पद्मश्री डॉ. गिरीश प्रभुणे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. भारतीय जनता पक्षाचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

यावेळी बोलताना ॲड. मोरेश्वर शेडगे म्हणाले, “गुरुंचे आशीर्वाद आणि समाजसेवेची प्रेरणा हीच खरी संपत्ती आहे. माझ्या वाढदिवसानिमित्त होणारा खर्च समाजोपयोगी कार्यासाठी वापरण्याचा संकल्प केला होता. गुरुपौर्णिमेच्या पवित्र दिवशी गुरुचरणी कृतज्ञतेची ही छोटीशी अर्पणभावना व्यक्त करता आली, याचे मनस्वी समाधान वाटते.” आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षण, संस्कार आणि सर्वांगीण विकासासाठी पुनरुत्थान समरसता गुरुकुलम गेल्या अनेक वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करीत आहे. या संस्थेच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांपर्यंत शिक्षणाचा प्रकाश पोहोचविण्याचे कार्य सुरू असून, या कार्याला हातभार लावण्याचा संकल्प ॲड. मोरेश्वर शेडगे यांनी गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने प्रत्यक्ष कृतीतून साकारला.

दरम्यान, पुनरुत्थान समरसता गुरुकुलम परिवाराच्या वतीने ॲड. मोरेश्वर शेडगे यांचा हृदयस्पर्शी सत्कार करण्यात आला. हा सन्मान स्वीकारताना त्यांनी तो समाजसेवेसाठी कार्यरत असलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याचा असल्याची भावना व्यक्त केली.

या कार्यक्रमास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पिंपरी-चिंचवड कार्यवाह नरेंद्रजी पेंडसे, पद्मश्री डॉ. गिरीश प्रभुणे, भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पुणे विभाग संघटन मंत्री प्रतीक पावडे, पिंपरी-चिंचवड प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिवराव खाडे, ‘ब’ प्रभाग समितीचे अध्यक्ष मंदार देशपांडे, सामाजिक समरसता साहित्य परिषदेच्या शोभाताई जोशी, संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याच्या माजी संचालिका चंद्रकलाताई शेडगे, भाजप राज्य परिषदेचे सदस्य पाटीलबुवा चिंचवडे, चिंचवड ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष नंदकुमार मुरडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षकवृंद आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वावर गुरुचरणी कृतज्ञता आणि समाजकार्यासाठी समर्पणाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

# पवना धरण ९८ टक्के भरले, धरणातून विसर्ग वाढणार

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पवना धरण परिसरात सुरू असलेल्या पावसामुळे धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत असून धरणाची पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी पवना नदीपात्रातील विसर्ग वाढविण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला आहे. यामुळे नदीकाठच्या गावांमधील नागरिक, शेतकरी व लाभधारकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.**



खडकवासला पाटबंधारे विभागाच्या पवना धरण प्रकल्पाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, पवना धरण 98 टक्के भरले असून सध्या नदीपात्रात 4,980 क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात तसेच घाटमाथ्यावर सुरू असलेल्या पावसामुळे धरणात मोठी आवक होत असल्याने दुपारी 3 वाजता नदीपात्रातील विसर्ग वाढवून 6,500 क्युसेक करण्यात येणार आहे.

पावसाचे प्रमाण आणि धरणातील आवक कायम राहिल्यास हा विसर्ग टप्प्याटप्प्याने वाढवत 12,000 क्युसेकपर्यंत नेण्याची शक्यता असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. विसर्ग वाढविण्याबाबतची माहिती वेळोवेळी जलसंपदा विभागाकडून प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

सततच्या पावसामुळे नदी, नाले आणि ओढ्यांमधील पाणीपातळी अचानक वाढू शकते. त्यामुळे नदीकाठच्या सखल भागांमध्ये पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. नदीपात्रातील शेती अवजारे, कृषी पंप, जनावरे तसेच इतर साहित्य तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवावे. तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाकडून दिल्या जाणाऱ्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन पवना धरण प्रकल्पाच्या पूर नियंत्रण कक्षाने केले आहे.

# प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे गुरुपौर्णिमा भक्तिभावाने साजरी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

ज्ञान, संस्कार आणि मूल्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याच्या उद्देशाने प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे गुरुपौर्णिमा उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व गुरुंच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी गुरुंच्या महत्त्वावर आधारित मनोगते, कविता, भक्तिगीते तसेच सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व, शिस्त, ज्ञान आणि चारित्र्य यांचे मूल्य समजावून सांगितले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये गुरुजनांविषयी आदर, कृतज्ञता आणि संस्कारांची जाणीव अधिक दृढ झाली. संपूर्ण शाळा परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. शाळेच्या व्यवस्थापनाने व प्राचार्यांनी विद्यार्थी व शिक्षकांच्या उत्स्फूर्त सहभागाचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे मत व्यक्त केले.



# पिंपरी चिंचवड लोडशेडिंगमुक्त करण्यासाठी 'मास्टर प्लॅन'

## महावितरणच्या 'प्रकाश भवन' कार्यालयामध्ये शहरातील वीज प्रश्नांवर महत्वपूर्ण बैठक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, ग्राहकसंख्या आणि विजेची मागणी लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवडची वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी चिंचवड विधानसभा क्षेत्राचे आमदार शंकर जगताप यांनी पुढाकार घेतला आहे. वीज विषयक प्रलंबित कामांना गती देण्यासाठी आयोजित बैठकीत त्यांनी महापारेषण आणि महावितरणला कालबद्ध, परिणामकारक आणि भविष्यवेधी नियोजन करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.**



> "पिंपरी-चिंचवड शहराचा झपाट्याने होणारा विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता अखंडित, सक्षम आणि अखंड वीजपुरवठा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. विजेच्या वाढत्या मागणीचा विचार करून भविष्यातील गरजांनुसार वीजयंत्रणेची क्षमता वाढवणे, नवीन सबस्टेशन उभारणे आणि प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावणे याला माझे सर्वोच्च प्राधान्य आहे. महापारेषण आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांनी केवळ प्रस्तावांवर न थांबता दरमहा उद्दिष्टे निश्चित करून कामाचा प्रत्यक्ष वेग वाढवावा. पीसीएमसी आणि पीएमआरडीएच्या समन्वयाने एकात्मिक नियोजन करून शहर पूर्णपणे लोडशेडिंगमुक्त करण्यासाठी कालबद्ध रीतीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत." महत्वाचे म्हणजे पिंपरी चिंचवड राजगुरुनगर, लोणावळासह नवीन परिमंडळाचा प्रस्ताव ठेवण्यात आला असून, यामुळे शहराला स्वतंत्र वीज परिमंडळ मिळून प्रशासकीय कामांना मोठी गती मिळणार आहे आणि ग्राहकांच्या तक्रारींचे जलद गतीने निवारण होण्यास मदत होणार आहे.
>
> **- शंकर जगताप, आमदार , चिंचवड विधानसभा.**

पिंपरी चिंचवड मतदारसंघनिहाय वीज वितरण सनियंत्रण समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या समित्यांमार्फत स्थानिक वीजसमस्यांचा नियमित आढावा घेतला जाणार आहे. महत्वाचे म्हणजे पिंपरी चिंचवड राजगुरुनगर, लोणावळासह नवीन परिमंडळाचा प्रस्ताव ठेवण्यात आला असून, यामुळे शहराला स्वतंत्र वीज परिमंडळ मिळून प्रशासकीय कामांना मोठी गती मिळणार आहे आणि ग्राहकांच्या तक्रारींचे जलद गतीने निवारण होण्यास मदत होणार आहे.

मुख्य म्हणजे पुढील सहा महिन्यांत पाषाण–सांगवी वीजवाहिनी, यशदा परिसरात नवीन वीज उपकेंद्र, पिंपरी-चिंचवड शहरासाठी आवश्यक नवीन वीज उपकेंद्रे आणि सबस्टेशनचा सविस्तर प्रकल्प अहवाल, गहुंजे येथील प्रस्तावित २२०/२२ केव्ही, ३०० एमव्हीए क्षमतेच्या अतिउच्चदाब उपकेंद्राच्या प्रस्तावाला गती देण्याबाबत चर्चा झाली. अधिकाऱ्यांनी कोणती कामे पूर्ण करायची, प्रत्येक कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्रस्ताव मुख्य कार्यालयाकडे कधी पाठविणार आणि मंजुरीपासून निविदा प्रक्रियेपर्यंत किती कालावधी लागणार, याचे निश्चित वेळापत्रक तयार करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या. केवळ प्रस्ताव तयार करून न थांबता दर महिन्याला उद्दिष्ट निश्चित करून प्रत्यक्ष प्रगतीचा आढावा घेण्यावर भर द्या असे स्पष्ट निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

महावितरण 'प्रकाश भवन' कार्यालयामध्ये (दि ३१) रोजी ही बैठक पार पडली. बैठकीमध्ये पिंपरी चिंचवड शहराच्या सुनियोजित व्यवस्थित आणि सक्षम वीज पुरवठ्यासाठी आक्रमक भूमिका घेतली. यावेळी मुख्य अभियंता (महापारेषण) अनिल भारसाकळे,अधीक्षक अभियंता (महापारेषण) व्ही. डी. भुजबळ , अधीक्षक अभियंता (महापारेषण) जे.एम. कोकाटे, अधीक्षक अभियंता (सिव्हिल) पी. एच. काकडे , कार्यकारी अभियंता (पिंपरी) एस. एस. मुंडे, सहाय्यक कार्यकारी अभियंता (सांगवी) के. एस. गिरी, कार्यकारी अभियंता (भोसरी) व्ही. एस. लहाने, उपविभागीय अधिकारी (हिंजवडी) एस. बी. पाटील, उपविभागीय अधिकारी (खराळवाडी) डी. बी. तरंगे आदी उपस्थित होते.

बैठकीत पाषाण–सांगवी वीजवाहिनीचे काम सहा महिन्यांत सुरू करण्याचे, यशदा परिसरात नवीन वीज उपकेंद्रासाठी जागेचा प्रस्ताव तातडीने मार्गी लावण्याचे तसेच सन २०५१ पर्यंतची लोकसंख्या लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवडसाठी नवीन उपकेंद्रे व सबस्टेशनचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. गहुंजे येथील २२०/२२ केव्ही, ३०० एमव्हीए उपकेंद्राच्या प्रस्तावाला गती देण्यासह रावेत, पुनावळे, किवळे व ताथवडे परिसरातील वाढत्या विजेच्या मागणीसाठी आवश्यक पायाभूत सुविधांचे नियोजन करण्यावर भर देण्यात आला. शहराच्या भविष्यातील वाढत्या वीज गरजा लक्षात घेऊन दीर्घकालीन आणि सक्षम वीज पायाभूत सुविधा उभारण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला.

पूरप्रवण भागातील डीपी, ट्रान्सफॉर्मर व वीजयंत्रणा सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करणे, रावेतमधील दुसरा ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित झाल्याने वीजपुरवठा अधिक सक्षम करणे, मतदारसंघनिहाय वीज वितरण समित्या स्थापन करणे, भूमिगत वीजवाहिन्यांच्या संरक्षणासाठी संयुक्त समिती स्थापन करणे तसेच अनधिकृत जाहिरातींवर कठोर कारवाई, ट्रान्सफॉर्मरभोवती संरक्षक जाळी बसवणे, धोकादायक वीजयंत्रणेची तातडीने दुरुस्ती करणे आणि नागरिकांच्या तक्रारींच्या जलद निवारणासाठी नियमित ग्राहक मेळावे आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. नागरिकांना सुरक्षित, अखंड आणि दर्जेदार वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

# प्रतिभा ज्युनिअर कॉलेजमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**कमला शिक्षण संस्थेच्या प्रतिभा ज्युनिअर कॉलेजमध्ये गुरुपौर्णिमेचा उत्सव प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक कला केंद्र समितीच्या वतीने उत्साहपूर्ण, भक्तिमय आणि भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.**



कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी गायन, नृत्य तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आकर्षक सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. बारावीची विद्यार्थिनी आसावरी बदडे हिने सादर केलेल्या भावपूर्ण गायनाने कार्यक्रमाला विशेष रंगत आणली, तर विद्यार्थिनींच्या नृत्याविष्काराला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरलेल्या मातृपूजन उपक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या मातांचे पूजन करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या भावनिक क्षणांनी उपस्थितांचे डोळे पाणावले.

यावेळी विद्यार्थ्यांच्या हस्ते शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. गुरुंच्या मार्गदर्शनामुळेच जीवनाला योग्य दिशा मिळते, ही भावना विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी केलेल्या या सन्मानामुळे शिक्षकवृंदही भारावून गेले.

समारोपप्रसंगी प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांनी आयुष्यभर गुरुजनांप्रती आदर, कृतज्ञता आणि संस्कार जपावेत, असे आवाहन केले.

याप्रसंगी संस्थेचे सचिव डॉ. दीपक शहा, डॉ. भूपाली शहा तसेच संचालिका डॉ. तेजल शहा यांनी शिक्षकांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रवींद्र निरगुडे व विद्यार्थ्यांनी केले, तर आभार प्रदर्शन सांस्कृतिक कला केंद्र समितीच्या प्रमुख प्रा. सुप्रिया चेडे यांनी केले.

# अप्पूघरचा लवकरच कायापालट!

## शहरातील सर्वात जुने मनोरंजन केंद्र असलेल्या निगडी येथील अप्पूघरचा संपूर्ण कायापालट होणार

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील प्रमुख पर्यटन केंद्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या निगडी येथील स्वर्गीय इंदिरा गांधी उद्यानातील अप्पूघर आता नव्या व अत्याधुनिक रूपात पाहायला मिळणार आहे. १८ कोटी ६० लाखांच्या खासगी गुंतवणुकीतून या उद्यानाचा कायापालट करण्यात येणार आहे.**




महापालिकेचे शहरातील सर्वांत जुने मनोरंजनालय म्हणून अप्पूघरची ओळख आहे. काळाच्या ओघात येथील बहुतांशी खेळणी जुनी झाली आहेत. जुन्या आणि जीर्ण झालेली यंत्रसामग्री व खेळणीमुळे नवी पिढी याकडे आकर्षित होत नसल्याने पर्यटकांच्या संख्येत मोठी घट झाली आहे. त्याचा थेट परिणाम महसुलावर होत होता. नव्या पर्यटन स्थळांशी स्पर्धा करणे कठीण झाल्यामुळे अप्पूघरचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. अप्पूघरच्या ठेकेदाराकडून १८ कोटी ६० लाख रुपयांची येथे गुंतवणूक केली जाणार आहे. तेथे पाण्यावरील घसरगुंडी, फ्लोइंग सिनेमा, ३६० अंशातील इमर्सिव्ह डोम, हॉरर हाऊस, मिरर मेझ व इन्फिनिटी टनल, नायगारा कृत्रिम धबधबा, किड्स ट्रॅफिक पार्क, आर्केड गेम्स, एआर-व्हीआर झोन आणि इंटरॅक्टिव्ह सेल्फी झोन यांसारख्या अत्याधुनिक व थरारक राईड्सची भर पडणार आहे. नेचर व किड्स थीमवर उद्यानात सुशोभीकरण केले जाणार आहे.

डिजिटल तिकीट प्रणाली, स्मार्ट वाहनतळ, आधुनिक फूड कोर्ट, पिण्याचे पाणी, अग्निसुरक्षा, सीसीटीव्ही कॅमेरे, आपत्कालीन यंत्रणा उपलब्ध असणार आहे. अत्याधुनिकरण १८ महिन्यांत पूर्ण करण्यात येणार आहे. अप्पूघर पुढील १५ वर्षांसाठी ठेकेदाराला देण्यास उपसूचनेसह स्थायी समितीने मान्यता दिली.

अप्पूघरच्या आधुनिकीकरणामुळे पिंपरी-चिंचवड शहराला आधुनिक आणि जागतिक दर्जाचे मनोरंजन केंद्र मिळणार आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक नागरिकांसह राज्यभरातील पर्यटकांचे आकर्षण वाढून पर्यटनाला चालना मिळेल. तसेच रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊन शहराच्या आर्थिक विकासालाही बळ मिळण्याची अपेक्षा आहे. अत्याधुनिक सुविधा आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांमुळे अप्पूघर पुन्हा एकदा कुटुंबांसाठी आवडते पर्यटनस्थळ म्हणून ओळख निर्माण करेल.

### शौचालयाचे धोरण

वाढते शहरीकरण, झपाट्याने होणारे नागरीकरण आणि लोकसंख्येच्या तुलनेत निर्माण होणाऱ्या गरजा लक्षात घेऊन महापालिकेच्या वतीने नवीन शौचालय धोरण तयार करण्यात आले आहे. या धोरणामुळे शहरातील प्रत्येक नागरिकाला स्वच्छ, सुरक्षित आणि सुलभ सार्वजनिक स्वच्छतागृहांची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. शौचालयांची सद्य:स्थिती, उपलब्ध सुविधा, लोकसंख्येच्या तुलनेत आवश्यक शौचालयांची संख्या, सार्वजनिक ठिकाणे, बाजारपेठा, वाहतूक केंद्र, उद्याने, धार्मिक स्थळे, झोपडपट्टी व दाट लोकवस्तीचे भाग, प्रमुख रस्ते व इतर गर्दीच्या ठिकाणांचा विचार करून तयार करण्यात आलेल्या नवीन धोरणालाही मान्यता देण्यात आली.

# शहरातील रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता? महापालिकेचे दुर्लक्ष

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करून स्पाईन रोड उभारला आहे; परंतु मागील काही दिवसांपासून या रस्त्यावर खड्डे पडले आहेत. याकडे महापालिकेच्या संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने येथून प्रवास करणाऱ्या हजारो नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. तसेच वाहनचालकांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. तरी या रस्त्यातील खड्डे त्वरित बुजवून रस्ता रहदारीस सुरळित करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.**



प्रभाग क्रमांक ११ मधील कृष्णानगर स्पाईन रोड परिसरात सध्या मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याने वाहनचालक आणि नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसामुळे रस्त्याची अक्षरश: चाळण झाली आहे.

वारंवार तक्रारी करूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कारवाई केली जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

स्पाईन रोड हा शहरातील महत्त्वाचा रहदारीचा मार्ग आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात सर्वसाधारण व अवजड वाहतूक सुरू असते. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना असून महापालिकेने तातडीने खड्ड्यांची डागडुजी करावी, अशी मागणी होत आहे. गेल्या वर्षीही याच स्पाईन रोडवरील खड्ड्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी नागरिकांनी खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करून अनोख्या पद्धतीने निषेध आंदोलन केले होते.

मात्र, त्यानंतरही परिस्थितीत कोणतीही सुधारणा झाली नसून, यंदाच्या पावसाळ्यात पुन्हा एकदा संपूर्ण परिसरात मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे अपघातांचा धोका वाढला असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

### खड्ड्यांच्या दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपये

पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरात सुमारे ५६० खड्डे असल्याचा दावा केला असून, गेल्या वर्षभरात खड्ड्यांच्या दुरुस्तीसाठी150 कोटी रुपये खर्च केल्याचे सांगितले आहे. मात्र, प्रत्यक्षात रस्त्यांची अवस्था पाहता हा निधी नेमका कुठे खर्च झाला, याची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सखोल चौकशी करावी, अशी मागणी नागरिक करत आहेत.